Draw Ask Copilot of 547

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीकाटिप्पणी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार/ पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने खालीलप्रमाणे:-**

**१) श्री. संदीप कारमवार, माजी सरपंच, ग्रामपंचायत आकापूर, ता. मूल, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर प्लांट मधून वातावरण व पर्यावरणासंदर्भात काय उपाययोजना करण्यात येणार आहे याची माहिती द्यावी. स्थानिक जनतेला व प्रकल्पग्रस्त गावांना काय लाभ होणार आहे याची माहिती देखील देण्यात यावी. स्थानिक मजुरांच्या समस्या कशा प्रकारे सोडविण्यात येईल याची माहिती देण्यात यावी. | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं.०७ मध्ये नमूद आहे. |

**२) श्री. मंगेश पोतवार, टेकाडी, ता. मूल, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या परिसरात येणाऱ्या उद्योगांचे आम्ही समर्थन करतो कारण त्यामुळे स्थानिक बेरोजगारीची समस्या दूर होते. सदर प्रकल्पामध्ये स्थानिकांना रोजगार मिळणार काय तसेच प्रकल्पग्रस्त गावांकरिता कोणत्या प्रकारच्या उपाययोजना करण्यात येणार आहे याची माहिती देण्यात यावी. कंपनी प्रशासनाला विनंती आहे की त्यांनी स्थानिकांना, युवकांना व महिलांना रोजगारात प्राधान्य द्यावे. | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं.०७ मध्ये नमूद आहे. |

**३) श्री. नंदू रणदिवे, उपाध्यक्ष, मूल नगर परिषद, ता. मूल, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मुल तालुक्यात असंख्य प्रमाणात बेरोजगार उपलब्ध आहेत त्यामुळे कंपनीने स्थानिकांना रोजगारात प्राधान्य द्यावे. चंद्रपूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात जंगल असल्याने प्रदूषणाचा धोका उद्भवणार नाही. | प्रकल्प प्रवर्तकाने एकत्रितरीत्या उत्तरे दिली जी अ.क्रं.०७ मध्ये नमूद आहे. |

Draw Ask Copilot of 547

| | | |
|---|---|---|
| | विकास करणे. आरोग्य शिबीर घेणे पर्यावरणीय सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे. | |

७) **प्रकल्प प्रवर्तकातर्फे श्री. प्रणय पाठक, मे. दिनानाथ अलाईड स्टील मॅन्युफॅक्चरिंग प्रा. लि.:-**

| अ. क्रं. | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|
| १) | स्थानिकांना रोजगारात त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनूसार प्रथम प्राधान्य देण्याचा प्रयत्न करण्यात येईल. स्थानिक कंत्राटदारांना देखील कंपनीच्या प्रकल्पाच्या बांधकामावेळी प्राधान्य देण्यात येईल. परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात येईल. तसेच परिसरातील ग्रामपंचायतींना योग्य ती मदत करण्यात येईल. तसेच पसिरातील गावांमध्ये सोई सुविधा पूरविण्याचा प्रयत्न करण्यात येईल. प्रदूषण नियंत्रणासाठी अत्याधुनिक पद्धतीचा उपयोग करण्यात येईल. सीएसआर अंतर्गत निधी देण्यात येईल. ग्रामपंचायतीकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेण्यात येईल. पावसाचे पाणी साठविण्यासाठी उपाययोजना करण्यात येतील. गावात, रस्त्यालगत फळांचे, फुलांचे झाड लावण्यात येतील. |

८) **श्री. आकाश येसनकर, तालुका अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, ता. मूल, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर प्रकल्पामुळे वायु, जल व मातीचे प्रदूषण होणार आहे. कंपनीला विनंती आहे की त्यांनी प्रदूषण रोखण्याकरिता उपाययोजनांची प्रत्यक्षात अंमलबजावणी करावी. मुल शहरामध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्था असून तेथील विद्यार्थ्यांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण शिबीर राबविण्यात यावा. | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |

९) **श्री. संदीप कारमवार, माजी सरपंच, ग्रामपंचायत आकापूर, ता. मूल, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझी प्रदूषण विभागाला विनंती आहे की त्यांनी या परिसराची पाहणी करावी. या परिसरामध्ये अस्तित्वात असलेल्या उद्योगांमधून मोठ्या प्रमाणात वायु प्रदूषण होत असून याबाबत कंपनीला वेळोवेळी निवेदन देऊनही कोणतीही कार्यवाही होत नाही. प्रदूषण नियंत्रण विभागाला विनंती आहे की, त्यांनी परिसराची पाहणी करावी व दोषी आढळून आलेल्या उद्योगांवर कारवाई करावी जेणेकरून पसिरातील प्रदूषणाच्या समस्येवर तोडगा निघणार. | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |

